# यंदाचा 'विद्या व्यास पुरस्कार' संतश्रेष्ठ ज्ञानमहर्षी ह.भ. प. मा. श्री. बाबामहाराज सातारकर व मा. पंडीत श्री. शौनक अभिषेकी यांना जाहीर.

विद्या सहकारी बँकेतर्फे दिला जाणारा यंदाचा (सन २०१३ करिताचा) सोळावा 'विद्या व्यास पुरस्कार **'संतश्रेष्ठ ज्ञानमहर्षी ह.भ.प. मा. श्री. बाबामहाराज सातारकर व मा. पंडित श्री. शौनक अभिषेकी' यांना जाहीर** करण्यात आला आहे. बँकेच्या दरवर्षीच्या प्रथेनुसार 'गुरुपौर्णिमा' म्हणजेच 'व्यास पौर्णिमे' च्या दिवशी पुरस्कारार्थींची नांवे जाहीर करण्यात येतात. विविध क्षेत्रांमध्ये गुरुतुल्य कार्य करुन समाजाच्या सर्वांगिण उन्नतीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या गुणीजनांना दरवर्षी बँकेतर्फे हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. ज्ञानक्षेत्राचा व्यापक विचार करुन ही निवड केली जाते. ज्येष्ठ व्यक्तीला कृतज्ञता म्हणून, तर ऐन उमेदीत असणाऱ्या ज्ञानप्रसारकाला प्रोत्साहनात्मक म्हणून हा पुरस्कार दिला जातो.

## १) संतश्रेष्ठ ज्ञानमहर्षी ह.भ.प. मा. श्री. मा. बाबामहाराज सातारकर - ज्येष्ठ शिक्षक पुरस्कार

समाज शिक्षणाचे कार्य आपल्या प्रवचनातून पार पाडणारे संतश्रेष्ठ ज्ञानमहर्षी ह.भ.प. परमपूज्य श्री. बाबामहाराज सातारकर यांचा जन्म दि. ५ फेब्रुवारी १९३६ रोजी साताऱ्याच्या नामवंत गोरे सातारकर घराण्यात झाला. त्यांनी कायद्याचे पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. त्यांच्या घरण्यातील तीन पिढ्यांपासून किर्तनाची व प्रवचनाची परंपरा चालत आलेली आहे. वारकरी संप्रदायातील प्रमुख फड म्हणून त्यांच्या घराण्यांच्या सातारकर फडाचे नाव घेतले जाते. कायद्याचे शिक्षण घेतलेल्या बाबामहाराजांनी प्रकाशित केलेली ज्ञानेश्वरीची एक विशेष आवृत्ती 'ऐश्वर्यवती ज्ञानेश्वरी' या नावाने प्रसिद्ध आहे. अध्यात्माचे ज्ञानभंडार असलेले ह.भ.प. श्री. बाबामहाराज यांनी ज्ञानेश्वरी, श्रीगाथा, दासबोध व शिवलीलामृत यांचा विशेष अभ्यास केला आहे. ह.भ.प. श्री. बाबामहाराज सातारकर यांच्या रसाळ, अमोघ व मधूर प्रवचनाने श्रोत्यांच्या मनाची पकड धरली जाते. त्यांच्या प्रवचन व किर्तनामध्ये सामाजिक सलोखा, व्यसनमुक्ती, सहकार, एकात्मता या विषयांची पेरणी असते. त्यांनी दूधीवरे (लोणावळा) येथे संतश्रेष्ठांचा प्रकल्प उभा केला आहे. वृत्तपत्रांमध्ये त्यांनी संतसाहित्यावर विपूल लिखाण केले आहे. तसेच पुणे विद्यापीठाच्या श्री. ज्ञानेश्वर अभ्यासनावर ते निमंत्रित तज्ज्ञ आहेत. त्यांना आजपर्यंत अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे. जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत किर्तन करण्याचा संकल्प त्यांनी सोडला आहे.

## २) मा. पंडित श्री. शौनक अभिषेकी - तरुण शिक्षक पुरस्कार

संगीत क्षेत्रात विद्यादानाचे पवित्र काम करणारे तरुण पिढीचे संगीतकार व गायक म्हणून प्रामुख्याने श्री. शौनक अभिषेकी ह्यांचे नाव घ्यावे लागेल. भारतीय क्लासिकला संगीतात त्यांनी आपले विशिष्ट असे स्थान निर्माण केलेले आहे. मा. श्री. पंडित जितेंद्र अभिषेकी ह्यांचे ते पुत्र होत. जयपूर घराण्याच्या श्रीमती कमल तांबे यांचेकडून त्यांचे संगीताचे शिक्षण झालेले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या वडिलांकडून कडक शिस्तीत त्यांचे पुढील संगीताचे शिक्षण पार पडले. संगीताच्या कार्यक्रमासाठी त्यांनी अनेक वेळा परदेश दौरा केलेला आहे. टाईम्स् म्युझीक, सोनी म्युझीक, म्युझीक टुडे, निनाद म्युझीक EMI ह्या प्रसिद्ध संगीत कंपन्यांसाठी त्यांनी काम केलेले आहे. श्री. जितेंद्र अभिषेकी यांनी स्थापन केलेल्या तारांगिणी सांस्कृतीक प्रतिष्ठानचे कार्य श्री. शौनक ह्यांनी पुढे चालू ठेवले असून नवोदित संगितकार व गायकांसाठी स्कॉलरशिप देण्यात येते. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानतर्फे प्रसिद्ध व ज्येष्ठ गायकांसाठी पेन्शन देण्यात येते. त्यांना आजपर्यंत अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

*******************************************************